# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक :-२३६६ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ३ फेब्रुवारी, २०२०
03 FEB 2020

**:: परिपत्रक ::**

विषय: **सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत मंत्रालयीन विभागांनी विधान भवन प्रवेपत्रिका मिळण्यासाठी अत्यावश्यक तेवढ्याच अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे कळविण्याबाबत...**

महाराष्ट्र विधानमंडळाचे **सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी , २०२०** रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होत आहे. सदर अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिका देण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(१) अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांच्या कार्यालयातील खाजगी सचिव, प्रत्येकी १ विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक, चोपदार व २ शिपाई कर्मचाऱ्यांची नावे 'खाजगी सचिव' यांच्या स्वाक्षरीने **दिनांक १२ फेब्रुवारी, २०२०** पर्यंत या सचिवालयास कळवावीत.

(२) मंत्रालयीन विभागांनी विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी जास्तीत जास्त ३० अधिकाऱ्यांची व २० कर्मचाऱ्यांची नावे त्यांच्या विभागाच्या उप सचिवांच्या स्वाक्षरीने **दिनांक १२ फेब्रुवारी, २०२०** रोजीपर्यंत या सचिवालयास कळवावीत. जेणेकरून प्रवेशपत्रिका वितरणापूर्वी प्रवेशपत्रिकेवर संबंधितांचे नाव, पदनाम, विभाग इ.माहिती लिहिणे सोईचे होईल. **विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

(३) सन २०२० च्या विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाकरिता प्रवेशपत्रिका उपलब्ध करून घेतल्यानंतर त्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रवेशपत्रिकाधारकांच्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे छायाचित्र व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा शिक्का असणे अनिवार्य राहील.

(४) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र व प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

..२/-

(५) मा.मंत्री/राज्यमंत्री, आस्थापना तसेच, संबंधित मंत्रालयीन विभागाचे दिलेले स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असेल तरच विधानभवनामध्ये प्रवेश देण्यात येईल.

(६) अधिवेशन कालावधीत दैनंदिन प्रवेशपत्रिकांची मागणी मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांच्या स्वीय सहाय्यकांच्या स्वाक्षरीने न करता **खाजगी सचिवांच्या स्वाक्षरीने करावी.**

(७) अधिवेशन कालावधीत दैनंदिन प्रवेशपत्रिकांची मागणी कक्ष अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने न करता आपल्या **विभागाच्या उप सचिवांच्या स्वाक्षरीने करावी. सदरील प्रवेशपत्रिका फक्त ग-१ कक्ष, १७ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे उपलब्ध होतील.**

(८) अधिवेशन कालावधीत विधानमंडळ परिसर व अधिकारी गॅलरी येथे होणारी गर्दी लक्षात घेता अधिवेशनाच्या कामासंदर्भात दैनंदिन उपस्थित राहणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांकरिता वेळापत्रक तयार करुन प्रवेशपत्रिकांची मागणी करावी.

(९) नागपूर (हिवाळी) अधिवेशन, २०१९ साठी घेतलेल्या प्रवेशपत्रिकांच्या दुरूपयोग होऊ नये यासाठी प्रत्येक विभागाने सदर प्रवेशपत्रिका न चुकता परत कराव्यात व त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२० साठीच्या अधिवेशनाच्या प्रवेशपत्रिकांची मागणी करावी.

वरील सुरक्षाविषयक सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

**(रविंद्र जगदाळे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति माहितीस्तव:
(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
(२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
(३) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

प्रति :

(१) मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री/मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

(२) मंत्रालयीन विभागाचे सर्व प्रधान सचिव/सचिव

याची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

\\Mls-g1-01\d\BUDGET SESSION 2020\PASS SECTION\PARIPATRAK.docx